| MHKO160000052026 | **रे.क.नं. ११/२०२६ मधील नि. ५ खालील आदेश** |
| --- | --- |

१. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज, सोबतचे प्रतिज्ञापत्र, दिवाणी प्रक्रीया संहिता, १९०८ चा नियम ३९, आदेश १,२ अन्वये प्रतिवादी विरूध्द तूर्तातूर्त मनाई मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. दावा मिळकतीचे वर्णन -

मौजे ससेगाव, ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर येथील ग्रामपंचायत ससेगाव यांचेकडील सन २०२३-२०२४ ते २०२६-२०२७ सालचे करआकारणी यादीस नोंद असलेची मिळकत मालमत्ता क्र. ३६ यासी चतु:सिमा

| | | |
| --- | --- | --- |
| पूर्वेस | - | यशवंत पारळे व जयवंत पारळे यांच्या घरमिळकती |
| पश्चिमेस | - | शामराव बंडु पाटील यांचे घर |
| दक्षिणेस | - | सादु आबा पारळे यांची घर मिळकत |
| उत्तरेस | - | रस्ता |

येणेप्रमाणे दावा मिळकत या मिळकतीला यापुढे दावा मिळकत असे संबोधण्यात येत आहे

३. वादीने पुढे असे कथन केले की, वादी व प्रतिवादी हे सख्खे भाऊ आहेत. दावा मिळकत ही मुळची वाडवडिलार्जित मिळकत होय. दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी यांचे वडील शंकर केशव पाटील यांच्या नावे नोंद आहे. शंकर केशव पाटील हे ता.१८/०२/२००६ रोजी मयत झाले असुन शंकर केशव पाटील यांचे नावे मौजे ससेगाव, ता. शाहूवाडी, जि. कोल्हापुर येथे शेतजमिनी असुन त्या वादी व प्रतिवादी यांनी सोयीप्रमाणे वहिवाटीस असुन त्याप्रमाणे वहिवाट करत आहेत. वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये शेतजमिनीबाबत सध्या कोणताही वाद नसल्याने त्याबाबत वादी यांनी कोणतीही दाद मागितलेली नाही. तसेच गट नं. ९६ मध्ये वादी व प्रतिवादी यांचे वडील शंकर यांचे नावे शेत घर मिळकत आहे. तथापि, त्याची नोंद ग्रामपंचायत दप्तरी नाही. सदर शेतघरात वादी यांची सर्व प्रतिवादी यांच्या संमतीने वहिवाट चालु आहे. त्याबाबत वादी यांना सध्या कोणतीही दाद मागणेची नाही. त्यामुळे शेत मिळकत या कामी समाविष्ट केलेली नाही.

४. वादीने पुढे असे कथन केले आहे की, दावा मिळकतीचे अद्याप सरस निरस मानाने वाटप झालेले नाही. वादी व प्रतिवादी हे दावा मिळकतीमध्ये समाईकात सोयीप्रमाणे कब्जा वहिवाट करत आलेले आहेत. अलिकडे वादी प्रतिवादी यांचे वडिलांचे नावे नोंद घरात वादी व इतर प्रतिवादींचे हिस्से नाकारून एकटा घर पाडुन माझे नावे लावणार, वादींना इतर काहीही घर मिळकतीत देणार नाही अशी भाषा करून वडिलार्जित वादी प्रतिवादीचे घर शुक्रवार, शनिवार, रविवार ता.२६/१२/२०२५ ते २७/१२/२०२५ अखेर घर पाडुन तेथे नविन घर बांधणेची तयारी सुरू केली आहे. प्रतिवादी नं. १ यांचे घर बांधकामाबाबत आमचे हिस्सेत द्या, नंतर काहीही करा असे सुचवले असता तुमचे हिस्से मला माहित नाहीत, मी या घरातील काही भाग देणार नाही, तुम्ही कोठे जायचे तेथे जा अशी भाषा केल्याने प्रतिवादी हे वादीचा हिस्सा गिळंकृत करतील अशी भाषा निर्माण झालेने वादींना हा दावा मे. कोर्टात सरस निरस मानाने वाटप होवुन तुटक कब्जा मिळणेसाठी दाखल केलेला आहे. सदरचे दावेस बराच दिनावधी लागणार आहे. दरम्यानच्या कालावधीत प्रतिवादी अगर तर्फे इसमांनी वाटप झाल्याखेरीज दावा मिळकतीत कोणत्याही प्रकारे बांधकाम करू नये व वादीचे वहिवाटीस हरकत अडथळा करू नये म्हणुन प्रतिवादी व तर्फे इसमांना तुर्तातूर्त मनाईचा आदेश होण्यासाठी वादींनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

५. प्रतिवादी नं.१ यांनी नि. १९ वर प्रस्तुतच्या अर्जास म्हणणे दाखल केले असुन प्रतिवादी नं. ३ यांनी नि.२० वर पुरशिस दाखल केली असुन प्रतिवादी नं. १ यांनी दाखल केलेले म्हणणे हे त्यांच्या कामी वाचण्यात यावे असे कथन केले आहे. प्रतिवादी नं.१ व ३ यांनी वादीचा प्रस्तुतचा अर्ज पुर्णत: खोटा, लबाडीचा, चुकीचा असल्याने त्यांना मान्य व कबुल नसल्याचे कथन केले आहे. वादीने दिलेली वंशावळ ही चुकीची असल्याचे कथन केले आहे. वादी व प्रतिवादी यांचे वडिल शंकर केशव पाटील हे दि.१८/०२/२००६ रोजी मयत झाले असुन वादी व प्रतिवादी नं. १ ते ३ यांना शालिनी ईश्वर पाटील नावाची सख्खी बहिण असुन ती विवाहीत आहे. त्यामुळे वादीने दावेत नमुद केलेली वंशावळ ही पुर्णपणे चुकीची आहे तसेच दावा मिळकतीच्या चतु:सिमा व बांधकामाचे वर्णन चुकीचे आहे. कारण दावा मिळकतीमधील पुर्वेकडील व पश्चिमेकडील भिंती या पुर्वीच म्हणजेच २००७ साली यशवंत व जयवंत पारळे यांना भिंतीचा निम्मा खर्च देवुन दोघात बांधलेली असुन पश्चिमेकडील भिंत ही शामराव बंडु पाटील व प्रतिवादी नं. १ या दोघात सामाईकात बांधत आहेत. दक्षिण बाजुस ग्रामपंचायतची रिकामी रस्त्याची जागा असुन त्या पलिकडे सादु आबा पारळे यांचे घर आहे त्यामुळे वादी किंवा प्रतिवादी यांचे घराचे दक्षिणेस सादु पारळे यांची घर मिळकत आहे. हे

वादीचे म्हणणे देखिल साफ चुकीचे आहे. वादी हे स्वच्छ हाताने सर्व वस्तुस्थिती घेवुन मे. कोर्टासमोर आलेले नाहीत. वादीचे दावेस दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ रूल ११ ची बाधा येत वादी हे मानसिक विकलांग असुन ते प्रत्येकाशी सुड बुध्दीने वागत असलेमुळे व स्वार्थी असलेमुळे त्याचा घटस्फोट देखिल झालेला आहे. त्या वेळच्या सर्व आर्थिक व मानिसक नुकसानीस सर्व एकत्रित कुटुंबास म्हणजे वादी, प्रतिवादी व त्यांचे वडिलांना सामोरे जावे लागले आहे. वादीने संपुर्ण एकत्र कुटुंबास खुप त्रास दिलेला असुन कुटुंबातील सदस्यास भिती दाखवुन त्यांचेकडुन वसुली करण्यासाठी अशा प्रकारचे दावे करण्याच्या इराद्यात असतो त्यामुळे संपुर्ण कुटुंब त्यास कंटाळलेले आहे.

६. प्रतिवादी यांनी पुढे असे कथन केले आहे की, वादी, प्रतिवादी यांचे आई-वडिल मयत झालेनंतर त्यांचे उत्तरकार्य संपलेनंतर वादी प्रतिवादी व त्यांची बहिण तसेच गावातील सुज्ञ पंच, सामाजिक कार्यकर्त्यांसमक्ष गावस्वरूपी तोंडी पध्दतीने सोयीचे वाटप २००७ साली झाले असुन सामाईकाम सर्वांच्या वहिवाटी आहेत. सदर सोयीने तोंडी वाटपाच्या वेळी वडिलार्जित जे काही होते ते समान वाटप केले होते. ते त्यावेळी वादी व प्रतिवादींनी मान्य केले होते. त्यामध्ये वडिल घर म्हणजे दावा मिळकत नं.३६ हे घर आहे. जसे होते तसे अशा परिस्थितीमध्ये प्रतिवादी नं. १ यांना सर्वानुमते सोडण्यात आले. कुटुंब एकत्र असतानाच घर मिळकत नं.११,१२ ही घरे देखिल होती. त्यापैकी घर नं.११ हे वादी यांना व घर मिळकत नं.१२ हे प्रतिवादी नं.३ यांना व घर मिळकत ६३ ही प्रतिवादी नं.२ यांना देणेत आले. सर्वच्या सर्व मिळकती या एकत्र कुटुंबाच्या पैश्यातुन बांधलेल्या आहेत. त्यामुळे घर मिळकत नं.३६ ही जुनी घर मिळकत ही प्रतिवादी नं.१ हा वडिल भाऊ म्हणजे मोठा असल्याने व त्या घरात वडिलांचा देव असलेमुळे ते घर वडिलकीच्या नात्याने सर्व वादी व प्रतिवादी यांनी प्रतिवादी नं.१ यांनाच पंचांसमक्ष सोडुन दिलेले असुन त्यावेळी ठरले प्रमाणे जो तो आपआपल्या घरात राहत आहे. वडिलार्जित एकत्र कुटुंबाचे शेत घर आहे ते सामाईकात तसेच असुन सर्वजण त्याचा आपआपल्या सोयीप्रमाणे सामाईकात वापर करत आहेत.

७. प्रतिवादी यांनी पुढे असे कथन केले आहे की, प्रतिवादी नं. १ हा मोठा भाऊ असुन वादी व प्रतिवादी यांनी सदरचे घर प्रतिवादी यांना सोडलेमुळे व सदरचे घर हे आपले वडिलांच्याच नावे असल्यामुळे भविष्यात एखादा भाऊ असा कायद्याचा आधार घेवुन त्याचा हिस्सा मागेल याची स्वप्नात देखिल प्रतिवादी नं.१ ने कल्पना केली नव्हती. प्रतिवादी यांना

कायद्याचे ज्ञान नसलेमुळे ते घर मिळकत नं.३६ आपले नावावर ग्रामपंचायत रेकॉर्डला करून घेतली नव्हती याचाच फायदा घेवुन प्रतिवादीकडुन वाटणी मागुन प्रतिवादी नं. १ कडुन पैसे उकळण्यासाठी वादी खोट्या स्वरूपाचा दावा घेवुन आलेला आहे.

८. प्रतिवादी यांनी पुढे असे कथन केले आहे की, वादी हे मानसिक विकलांग आहेत. त्यांना कोणतेही व्यावहारिक ज्ञान नसल्यामुळे ते कायम इतरांनादेखिल त्रास देत असतात. दावा मिळकत ही जुनी असलेमुळे ती २०२५ च्या पावसाळ्यात पडली होती. त्यामुळे प्रतिवादी नं.१ यांनी अगोदरच पुर्व व पश्चिम भिंतीचे त्या मिळकत धारकाबरोबर प्रेमाने सर्व व्यवहार करून भिंती सामाईकात बांधुन घेतलेमुळे व सध्या घर मिळकत पडलेमुळे निव्वळ दुरूस्ती बांधकाम करत आहेत. त्यास वादी हे प्रतिवादी नं.१ कडुन हिस्सा मागणेची भिती दाखवुन पैसे उकळण्यासाठी हा दावा घेवुन आलेला आहे व प्रतिवादीचे दुरूस्ती बांधकामास मनाई मागत आहेत. सदर बांधकामास मे. कोर्टाने मनाई केलेस प्रतिवादी नं.१ चे संपुर्ण कुटुंब उघड्यावर पडणार आहे व त्याचे कधीही न भरून येणार नुकसान होईल. प्रतिवादी नं.१ चे सर्व संसारोपयोगी साहित्य, अन्न-धान्य हे ऊन, वारा, पावसात उघड्यावर राहील त्यामुळे प्रतिवादी हा फार मोठ्या संकटात सापडणार आहे.

९. प्रतिवादी यांनी पुढे असे कथन केले आहे की, वादीने आपले दाव्यात सर्व मिळकतीचे सोईचे वाटप झाले असुन ज्याच्या त्याच्या सोईने कब्जे वहिवाट आहे असे कथन केले आहे. त्या प्रमाणे प्रतिवादी नं.१ ची देखिल २००७ पासुन आजअखेर घर मिळकत नं.३६ मध्ये कब्जे वहिवाट आहे हे नाकारता येणार नाही. त्यामुळे सदर मिळकतीचे मालक कब्जेवहिवाटदार म्हणुन संपुर्ण देखभाल दुरूस्तीचे सर्व हक्क व अधिकार प्रतिवादी नं.१ यांना प्राप्त झाले आहेत. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

१०. मी वादी, प्रतिवादी यांचे विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला, अभिलेखावरील वादकथन, दाखल कागदपत्रे यांचे अवलोकन केले आहे. वादी, प्रतिवादीं यांचे परस्परविरोधी वादकथन, अभिलेखावरील कागदपत्रे, युक्तीवाद या सर्व घटनांवरून प्रस्तुतचा अर्ज निकाली करण्यासाठी खालील मुद्दे उपस्थित झाले आहेत. मी सदर मुद्दयांचा निश्कर्ष कारणमिमांसेसह नमूद करीत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रथमदर्शनी केस वादी यांचे बाजूने आहे का ? | नकारार्थी |
| २. | सोईस्कर्तेचा तूला वादी यांचे बाजूने आहे का? | नकारार्थी |
| ३. | तूर्तातूर्त मनाई न दिल्यास वादी यांचे नुकसान होणार आहे का ? | नकारार्थी |
| ४. | आदेश ? | अर्ज नामंजुर करण्यात येत आहे |

<u>कारणमिमांसा -</u>

<u>मुद्दा क्र. १ ते ३ करीता -</u>

११. दोन्ही बाजुंच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादीनी नि. ३ सोबत मौजे ससेगाव, ता. शाहूवाडी, जि. कोल्हापुर येथील ग्रामपंचायत मिळकत गट नं. ३६ चा सन २०२३-२४ ते २०२६-२७ चा उतारा, मा. दुय्यम निबंधकसाो, शाहुवाडी, ता.शाहुवाडी, जि.कोल्हापुर यांचेकडील मौजे ससेगाव, ता.शाहुवाडी,जि.कोल्हापुर येथील मिळकत नं.३६चा मुल्यांकन दाखला, दावा मिळकतीचे फोटो इ. कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

१२. प्रतिवादीने नि.२३ सोबत मौजे ससेगाव येथील घर मिळकत नं.३६ चा असेसमेंट उतारा, मौजे ससेगाव येथील घर मिळकत नं.१२ चा असेसमेंट उतारा, मौजे ससेगाव येथील घर मिळकत नं.११ चा असेसमेंट उतारा, दावा मिळकत नं.३६ चे दुरूस्ती बांधकामाचा फोटो, वादी- प्रतिवादी यांचा ८अ चा खातेउतारा तसेच नि.२५ सोबत वादी प्रतिवादींची आई अनुबाई शंकर पाटील यांचा मृत्यू दाखला, वादी प्रतिवादी यांचेदरम्यान पंचांसमक्ष झालेले स्मरण टिपण (वाटणीपत्र), वादी नं.१ हा दुस-यांचे मिळकतीचे फोटो काढुन दावेस खोटा पुरावा सादर करत असल्याबाबतचे फोटो, इ. कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

१३. दोन्ही पक्षकारांचा विस्तृत युक्तिवाद ऐकल्यानंतर व कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर असे दिसते की, मालमत्ता क्र. ३६ ही वादी व प्रतिवादी यांचे वडील शंकर केशव पाटील यांच्या नावे दिसुन येते. वादीच्या कथनानुसार शंकर केशव पाटील हे १८/०२/२००६ रोजी मयत झालेले असुन त्यांच्या नावे असलेल्या शेतजमिनी या वादी व प्रतिवादी हे सोयीप्रमाणे वहिवाट करत आहेत व त्यांच्यात शेतजमिनीबाबत कोणताही वाद नाही. तसेच गट नं. ९६ मध्ये वादी व प्रतिवादी यांचे वडिलांच्या नावे शेतघर मिळकत आहे त्याची नोंद ग्रामपंचायत दप्तरी नाही व त्यामध्ये सर्व वादी व प्रतिवादी यांची संमतीने वहिवाट

आहे. याउलट प्रतिवादींच्या कथनानुसार वादी व प्रतिवादी यांचे आई वडिल मयत झालेनंतर त्यांचे उत्तरकार्य संपलेनंतर वादी, प्रतिवादी व त्यांची बहिण तसेच गावातील सुज्ञ पंच, सामाजिक कार्यकर्त्यांसमक्ष गावस्वरूपी तोंडी पध्दतीने सोयीचे वाटप २००७ साली झाले असुन सामाईकात सर्वांच्या वहिवाटीत आहेत. सदर वाटपाच्या वेळी वडिलार्जित जे काही होते ते समान वाटप केले होते व त्यावेळी ते वादी व प्रतिवादींनी मान्य केले होते. त्यामध्ये दावा मिळकत नं. ३६ हे जसे होते तसे प्रतिवादी नं. १ यांना सर्वानुमते सोडण्यात आले. कुटुंब एकत्र असतानाच घर मिळकत नं.११,१२ ही घरे देखिल होती. त्यापैकी घर नं. ११ हे वादी यांना व मिळकत नं. १२ हे प्रतिवादी नं. ३ यांना घर मिळकत नं. ६३ हे प्रतिवादी नं. २ यांना देण्यात आले. सर्व मिळकती या एकत्र कुटुंबाच्या पैश्यातुन बांधलेल्या आहेत व त्यावेळी ठरलेप्रमाणे सर्वजण आपआपल्या घरात राहत आहेत.

१४. प्रतिवादी यांनी नि.२३ सोबत अनु.क्र.२ वर मालमत्ता क्र. १२ चा उतारा दाखल केलेला असुन ते वादी यांच्या नावे दिसुन येत आहे. तसेच अनु.क्र.३ वरील मालमत्ता क्र.११ च्या उता-याची पाहणी केली असता ते प्रतिवादी क्र.३ यांच्या नावे दिसुन येत आहे. प्रतिवादी यांनी नि.२५ सोबत अनु.क्र. २ वर एक वाटणीपत्र हजर केलेले आहे. त्या वाटणीपत्राचे अवलोकन केले असता त्यावर वादी, प्रतिवादी व पंच यांच्या सह्या दिसुन येत आहेत. त्यामध्ये जुने राहते घर हे प्रतिवादी नं. १ यांना सोडुन दिल्याचे दिसुन येते व सखाराम शंकर पाटील यांना जुन्या घरात वाटणी होती त्याच्या बदल्यात सुरेश पाटील यांच्या वाटणीतील दोन गुंठे जमिन द्यावयाची आहे व तेथे सखाराम पाटील यांनी घर बांधले आहे असे नमुद असल्याचे दिसुन येते. तसेच सदर कागदपत्रावर माळरानातील जुने वडिलार्जित घर तोडुन चौघा भावांनी समान साहित्य घेतल्याचे दिसुन येते. तसेच सर्व भावांमध्ये सोन्याचे देखिल वाटप झाल्याचे सदर कागदपत्रावरून दिसुन येत आहे. तसेच सर्व शेतजमिनीच्या समान चार वाटण्या करण्याचे ठरल्याचे दिसुन येते.

१५. वादीचे दाव्यातील कथन पाहता वादी शेतमिळकतीबाबत तसेच शेतघराबाबत, इतर मिळकतींबाबत कोणताही वाद नसल्याचे कथन करत आहेत. यावरूनच प्रतिवादीने हजर केलेल्या वाटणीपत्रातील काही अटी हा वादी मान्य करत असुन काही अटी अमान्य करत असल्याचे प्राथमिकदृष्ट्या दिसुन येते. वादीच्या नावे असलेल्या घर मिळकतीबाबत वादीने दाव्यात कोणताही खुलासा केलेला नाही. वादीच्या कथनांवरून वादी हा स्वच्छ हाताने मे. कोर्टासमोर आल्याचे प्राथमिकदृष्ट्या दिसुन येत नाही. वादी व प्रतिवादींमध्ये

वाटणीपत्राप्रमाणे वाटप होवुन सर्वजण त्यांच्या हिश्याचा उपभोग घेत आहेत अथवा नाहीत हे दाव्याच्या अंतिम निकालावेळी शाबित होईल. प्राथमिकदृष्ट्या प्रतिवादीने हजर केलेल्या कागदपत्रांवरून दावा मिळकतीचा उपभोग प्रतिवादी नं.१ हे घेत असल्याचे दिसुन येत आहे. केवळ सदरची मिळकत ही वादी व प्रतिवादी यांच्या वडिलांच्या नावावर असल्याने केवळ त्याच मिळकतीत अजुनही वादी व प्रतिवादी यांची सामाईक वहिवाट आहे व इतर मिळकतीबाबत त्यांच्यात सोयीप्रमाणे वहिवाट असुन कोणतेही वाद नाहीत असे म्हणता येणार नाही. वादीचे दाव्यातील कथन पाहता वादीने इतर मिळकतींबाबत कोणतेही भाष्य केलेले दिसुन येत नाही. अभिलेखावरील कागदपत्रांवरून प्रतिवादी नं.१ यांना इतर कोणतेही राहण्याचे ठिकाण आहे हे दिसुन येत नाही. त्यामुळे वादीचा अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादी नं.१ यांचे कधीही न भरून येणारे नुकसान होईल असे दिसुन येते. याउलट प्रस्तुतचा अर्ज नामंजुर केल्यास वादी यांचे कोणतेही नुकसान होईल असे प्राथमिकदृष्ट्या दिसुन येत नाही. सद्यस्थितीत वादीचे लाभार्थ तुर्तातूर्त मनाई हुकूम देणेइतपत सोईस्करतेचा तुला वादीचे बाजुने दिसुन येत नाही. तसेच वादी व प्रतिवादी हे दावा मिळकतीच्या सामाईकात कब्जे वहिवाटीत आहेत हे देखिल प्राथमिकदृष्ट्या शाबित केलेले नाही. त्यामुळे प्रथमदर्शनी केस वादीचे बाजुने दिसुन येत नाही. तसेच तुर्तातूर्त मनाई हुकूम न दिलेस वादीचे कधीही न भरून येणारे नुकसान होईल असे प्राथमिकदृष्ट्या दिसुन येत नाही.

१६. एकंदरीतपणे, वादी यांनी प्रथमदर्शनी केस सिध्द केलेली नाही. तसेच, दाव्याचा समतोल हा वादीच्या बाजूने नाही. वादींनी सकृतदर्शनी केस सिद्ध न केल्यामुळे न्यायालय मुद्दा क्रमांक १ ते ३ चे उत्तर नकारार्थी नोंदवून मुद्दा क्रमांक ४ साठी खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

## आदेश

अर्ज निशाण ५ हा नामंजूर करण्यात येत आहे.

Digitally signed by Shraddha Dinkar Bagal

**(एस. डी. बागल)**
**सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,**
**शाहुवाडी मलकापूर**

**स्थळ- शाहुवाडी**
**दि. - १३/०२/२०२६**